


कुमुद गांगुली उर्फ अशोककुमार यांच्या जीवनातील काही विस्मयचकित प्रसंग अर्थात...

एका रूपेरी जीवनाची पटकथा

वधुपित्याची पगडी वरपित्याच्या पायाशी पडलेली. वरपिता त्यावर लाथ मारून म्हणाला, आम्ही मागितलेला हुंडा द्या नाहीतर भरल्या मांडवातून वरात परत जाईल. तुमची इभ्रत तुम्हीच सांभाळा. वधूकडची मंडळी असहाय होऊन हे दृश्य पहात होती. नववधू व तिच्या आई-वडलांच्या दिनवाण्या चेहऱ्याची करूणा समोरच्या पक्षाला अजिबात येत नव्हती.

इतक्यात कनवाळू हृदयाच्या डाकू राघोची टोळी तिथून निघालेली. वधूपित्याने मदतीसाठी डाकू राघोची याचना केली. सरदार, आमची अब्रू वाचवा. भरल्या मांडवातून वरात परत गेली तर आम्हाला जीवच द्यावा लागेल.

हे ऐकताच डाकू राघोचा पारा चढला. त्याचा चढलेला पारा नि रक्ताळलेल्या डोळ्यांकडे पाहून वरपक्षाची मंडळी घाबरून गेली. तिथल्या तिथेच लग्नाला त्यांनी होकार दिला. मुलीची पाठवणी करताना राघोने वरपित्याला सांगितले की, आजपासून ही माझी मुलगी झालीय. हिचा छळ झाला तर तुमची खैर नाही. श्रीमंताचा वैरी नि गरीबांचा कैवारी ब्रिटीशी सरकारच्या डोळ्यातील तसू बनलेला.

एकदा पोलीसांनी त्याला घेराव घालून पकडण्याचा प्रयत्न केला तेव्हा तो मंदिरात शिरला आणि ब्राह्मणाचं सोवळं नेसून मंत्रोच्चार म्हणू लागला. पोलीस त्याला पुजारी समजून तिथून निघून गेले. या घटनेने मात्र राघोचे हृदयपरिवर्तन झाले. त्याने कुकर्मे सोडली आणि तो तपश्चर्येस लागला. नंतर या डाकूच्या वारसदारांना ब्राम्हण म्हणून ओळखले जाऊ लागले. या डाकू राघोची पणती म्हणजे गौरीराणी आणि गौरीराणीचा मुलगा म्हणजे दादामुनी. पुढे हा डाकू राघोच्या पाचव्या पिढीतला बालक हिंदी सिनेमाच्या पडद्यावर 'दादा' बनला.

★ ★ ★

काही वर्षांपूर्वी भागलपूरातील कैद्यांच्या डोळ्यात ॲसिड टाकून त्यांना अंध केल्याच्या घटनेने खळबळ माजवलेली. याच बिहारच्या भागलपूरात १९११ साली १३ ऑक्टोबर रोजी अशोककुमार यांचा जन्म झालेला. पिता कुंजलाल त्या काळातील प्रसिद्ध वकील. भाषेवर त्यांचे प्रभुत्व आणि विनोदबुद्धीही कमालीची. कुंजलाल कोर्टात खटले लढवत तेव्हा तणावग्रस्त वातावरणही हलकेफुलके व्हायचे. पित्याचा हा विनोदबुद्धीचा वारसा त्यांच्या धाकट्या चिरंजीवाने किशोरकुमारने उचलला. अशोककुमार यांनी फारच कमी चित्रपटात विनोदी भूमिका केल्या पण त्या भूमिकाही वाखाणल्या गेल्या. मात्र वडलांचा ज्योतिषविद्येचा वारसा दादामुनींनीच घेतला.

एकदा एका चित्रपटाच्या सेटवर अशोककुमार चित्रपटाच्या दिग्दर्शकाबरोबर बसलेले. तो शनिवार होता. दादामुनींचा ड्रायव्हर तिथे आला नि म्हणाला, साहेब टीप द्या. दादामुनींनी दोन घोड्यांची नावे घेतली. ड्रायव्हर तिथून निघाल्यावर दिग्दर्शकांनी अशोककुमारना विचारले, तुम्ही रेस खेळता? यावर अशोककुमार हसत म्हणाले, वेड लागलंय का मला? पन्नास-शंभर रूपये मी का वाया घालवू? मी तर माझे ज्योतिषविद्येचे ज्ञान ताजे करतोय!

दिग्दर्शकाचा यावर विश्वासच बसेना. दादामुनींनी त्यांना शंभर रूपये देऊन दोन घोड्यांची नावे सुचवली व सांगितले की, विश्वास बसत नसेल तर हे घ्या पैसे आणि लावा त्या दोन घोड्यांवर. हारलात तर नुकसान तुमचं होणार नाहीच. माझे पैसे पाण्यात जातील. मात्र जिंकलात तर मला फोन करून कळवायला नका विसरू. दुसऱ्या दिवशी ड्रायव्हर व दिग्दर्शक दोघेही रेस जिंकून दादामुनींच्या घरी सांगायला आले. दादामुनी नुसते हसले आणि म्हणाले, ज्योतिषविद्या हे थोतांड नव्हेच! मात्र त्याचा व्यवसाय करणारे ढोंगी आहेत.

दादामुनींचे विद्येवर खूप प्रेम. ही अभ्यासू वृत्ती त्यांनी आपल्या आईकडून घेतली. गौरी राणी यांच्या खऱ्या अर्थाने शंभर शिक्षकांहून अधिक हुशारी होती. तिन्ही मुलांना त्या चिकाटीने शिकवत. पित्याची इच्छा अशोकला देशातील मुख्य

न्यायाधीश बनवण्याची होती. कायद्याचा अभ्यास करायला दादामुनी कलकत्त्यात गेलेले. तिथे त्यांचा मार्ग बदलला पण अभ्यासूवृत्ती कायम राह्यली. अशोककुमारना मातृभाषा बंगाली व्यतिरिक्त सात भाषा अवगत आहेत. संस्कृत, हिंदी, उर्दू, इंग्रजी, जर्मन, पर्शियन व फ्रेन्च. शिवाय ते एक उत्तम पेन्टरही आहेत.

★ ★ ★

लहानपणापासून अशोककुमार खूप कल्पक. आईबरोबर ते आजोळी जात तेव्हा वयोवृद्ध आजोबा सतत कुमुदलाच बोलावत. कुमुद म्हणजे अर्थातच अशोककुमार. वडलांनी तिन्ही मुलांची नावं खरंतर कवरूनच ठेवलेली. कुमुद, कल्याण व किशोर. चित्रपटसृष्टीत आल्यावर दोन्ही भावांनी नावं बदलली, अशोककुमार व अनुपकुमार किशोरकुमारने मात्र आपले नाव तसेच ठेवले.

आजोबांनी एकदा कुमुदला जवळ बोलावले. आजोबांशी गप्पा मारताना कुमुद म्हणाला, आजोबा, काल काय झालं...? मी जंगलात फिरायला गेलेलो...

जंगलात...? कधी गेलेलास? आजोबांनी विचारले.

तुम्ही दुपारी जेऊन आराम करत होतात ना तेव्हा गेलेलो. आपल्या शेताच्या पुढे गंगातटी जे जंगल आहे ना, त्या जंगलात. तिथे पक्ष्यांचा कलकलाट सुरू होता. गार वाऱ्याच्या झुळूकी वाहत होत्या. आणि इतक्यात अचानक वाघाने कुठूनतरी डरकाळी फोडली. सगळीकडे भयाण शांतता झाली. मी त्या शांततेलाच घाबरून जागच्या जागी खिळलो तर माझ्या पाठीमागे बंगाली वाघ. तो माझ्याकडे गुरकावून बघत होता. मी मनोमन देवाची करूणा भाकत होतो. मला संधी दिलीस तर मी झाडावर जाऊन चढेन. मला पंख फुटू देत. आणि खरंच मला पंख फुटले. मी झाडावर जाऊन चढलो. तर झाडाखाली वाघमामा कपाळाला हात लावून बसलेले.

चल हट लबाडा, तुला पंख फुटले होय रे शहाण्या? आजोबा म्हणाले, मग दाखव तुझी पंखं?

यावर चतुर नातू म्हणाला तुम्ही वाघ बनून दाखवा मग दाखवतो माझे पंख!

आजोबा यावर गडगडाटी हसले. त्यांनी एका ख्यातनाम कथाकाराशी कुमुदची गाठ घातली. त्या कथाकारावर कुमुद इतके प्रभावित झाले. कोण होते ते कथाकार ठाऊक आहे? ते होते शरदचंद्र चट्टोपाध्याय.

पुढे कुमुद अशोककुमार नावाने हिंदी चित्रपटाचे स्टार बनले तेव्हा न्यू थिएटर्सच्या लेखकांच्या कोंडाळ्यात बसले असताना पुन्हा एकदा शरदचंद्र चट्टोपाध्याय उर्फ शरदबाबू भेटले. मात्र यावेळी शरदबाबूंनीच अशोककुमारना आपला परिचय देत सांगितले आपण आधी भेटलोय, आठवतंय का? तुमच्या आजोबांनी आपली गाठ घालून दिलेली... अशोककुमार थक्कच झाले!


★ ★ ★

अशोककुमार दादामुनी बनले कसे?


त्यांची लाडकी बहीण सती राणी (शशधर मुखर्जी यांच्याबरोबर विवाहबद्ध झालेली) लाडाने त्यांना दादामुनी म्हणायची. त्यामुळे घरात ते सगळ्यांचेच दादामुनी झाले. नंतर दादामुनी बॉम्बे टॉकीजचे मालक झाले तेव्हा बॉम्बे टॉकीजचे आधीचे पारसी साथी शावक वाच्छा त्यांना कुठल्या नावाने हाक मारायचे म्हणून गोंधळात पडले. तेव्हा त्यांना दादामुनी हेच नाव आठवले. त्यांनी अशोककुमारना 'दादामुनी' म्हणून हाक मारायला सुरूवात केली आणि दादामुनी हे उपनाव अशोककुमारना कायमचे चिकटले.

★ ★ ★

कलकत्त्यात कुमुदलाल गांगुलींबरोबर शिकत होता. उत्तर प्रदेशातील एक युवकाचा साधेपणा कुमुदला खूप आवडायचा. हा युवक पुढे स्वातंत्र्यचळवळीत गांधीजींबरोबर जोडला गेला. तरी त्याने कुमुदची मैत्री कायम टिकवली. हा युवक पुढे देशाचा पहिला राष्ट्रपती बनला. होय तोच तो युवक डॉ. राजेंद्रप्रसाद.




सुमित्रादेवीसह *मशाल*मध्ये



*खिलाडी*मध्ये सुरैयासह




मुमताज शांतीसह *किस्मत*मध्ये



पुत्र अरूपकुमारसह *बेजुबान*



अछूत कन्या देविकाराणीसह




*समाधि*त नलिनी जयवंतसह



मीनाकुमारीसह *एक ही रास्ता*मध्ये



दादासाहेब फाळके पुरस्कार (१९८९) स्वीकारताना अशोककुमार



ज्वेलथीफ देव आनंद व वैजयंती मालासह



निरूपा रॉयबरोबर *कंगन*मध्ये

त्याकाळात खरंतर फिल्मी कलावंतांना तेवढा मान समाजात दिला जात नव्हता. त्यामुळे वकील पिता कुंजलाल यांनी आपल्या परिचयाच्या एका राजकीय नेत्याशी चर्चा करून मुलासाठी नोकरी शोधली. त्या नेत्याने तीन नोकऱ्यांची ऑफर पुढे केली. पोस्टात अधिकारी, आयकर अधिकारी व सचिवालयात सेक्रेटरी. कुंजलालना आयकर अधिकाऱ्याची ऑफर पसंत पडली. त्यांनी मुलाला तातडीने पत्र टाकले. 'तुझ्यासाठी चांगली नोकरी आहे. तू तात्काळ खांडव्याला रवाना हो.'

अशोककुमारनी वडलांचे हे पत्र बॉम्बे टॉकीजचे मालक हिमांशू रॉयना दाखवले. रॉयबाबू म्हणाले की, तू आणखी एक चित्रपट करून पहा. तो हिट नाही झाला तर मी तुला करारमुक्त करेन. अशोककुमारनी त्यांच्या म्हणण्याचा स्वीकार केला. त्या काळात तीस-पस्तीस दिवसात चित्रपट बनायचा. म्हणजे एक महिन्याचाच प्रश्न होता. हा चित्रपट बनला, रूजू झाला आणि रातोरात अशोककुमार स्टार झाले. खुद्द पंडित नेहरूंनी इंदिरा गांधी व सरोजिनी नायडूंसह तो चित्रपट पाह्यला व अशोककुमार यांची पाठ थोपटली. हा चित्रपट होता, *अछूत कन्या*. देशभर हा चित्रपट गाजला. आणि अशोककुमार कानाकोपऱ्यात जाऊन पोहोचले.

★ ★ ★

भूतप्रेतावर अशोककुमारांचा विश्वास नाहीच मुळी त्यावर विश्वास ठेवणाऱ्यांचीच ते थट्टा करीत. एकदा अशीच एक गंमतीशीर घटना बॉम्बे टॉकीजच्या आवारात घडली. १९३०-४०च्या दशकात बॉम्बे टॉकीज एका छोट्या शहरासमानच होती. त्यात तीन ते चार हजार माणसे राहत. अशोककुमारनी कंपनी खरीदल्यावर म्हणे, कंपनीच्या आवारात रात्री हिमांशू रॉय यांचे भूत दिसायचे म्हणे. अशोककुमार यांनी या गोष्टीचे मूळ शोधायचेच ठरवले. आणि त्यांनी शोधून काढलेच. ते भूत हिमांशू रॉय यांचे नव्हे तर आर्ट डायरेक्टर टागोर नामक त्यांचे साथीदार होते. ते खूप उशिरा रात्रीपर्यंत काम करतच राहात. आणि हिमांशू रॉय यांचा आवडता ब्राण्ड ५५५ सिगारेट पित ते आवारात रात्री फेरफटका मारत. टागोर हिमांशू यांच्याप्रमाणेच पांढरी पॅण्ट व पांढराच शर्ट घालत. शिवाय पायातही पांढऱ्याच चपला का बूट वापरत. अशा टागोरना अंधारात पाहून अंधश्रद्ध लोक त्यांनाच हिमांशू रॉय यांचे भूत मानत.

यानंतर भूतप्रेताचा विषय कुणी त्यांच्यापुढे काढीत नसे. नंतर त्यांनाच एकदा असा अनुभव आला की, त्यांची मान्यता साफ बदलली गेली. इतकेच नव्हे तर त्या घटनेवरून त्यांनी एक चित्रपट बनवला जो देशातला पहिलाच रहस्यमय चित्रपट ठरला. तो चित्रपट म्हणजे *महल*.

१९३८ साली अशोककुमार पत्नीसह सुट्टीत खंडाळ्याला गेलेले. तिथे एकही बंगला त्यांना रिकामा सापडला नाही. शेवटी जीजीभाई हाऊस नामक एक बंगला त्यांना रिकामा सापडला. त्या बंगल्याला लोक भूतबंगला म्हणत. त्यामुळे त्यात कुणी राह्यला बघत नसे. अशोककुमारनी त्यात राह्यचे आव्हान स्वीकारले. अशोककुमार दांपत्याला जेवायला वाढून बंगल्याचा नोकर रात्र होताच नातेवाईकांना भेटायच्या बहाण्याने बाहेर सटकला. त्याला त्या भूतबंगल्यात अजिबात राह्यचे नव्हते.

रात्री अशोककुमार यांनी बंगल्यात गोंधळ ऐकला. बंगल्याचा बगीचा ओलांडून फाटकापर्यंत ते आले. तेव्हा एक स्त्री मोटारीकडे उभी राहून ड्रायव्हरवर गरजत होती. ती स्त्री संपन्न घरातली दिसत होती. त्यांनी त्या बाईला विचारले, तेव्हा तिने अशोककुमार यांच्याकडे पाणी मागितले. आणि तरीही ती ड्रायव्हरवर गरजतच राह्यली. गाडी गरम झालीय. त्यात पाणी आहे की नाही, हे आधी तपासून घ्यायला नको होतेस का तू?

अशोककुमार म्हणाले, बाई चिडू नका. मी पाणी आणून देतो. ती स्त्री त्यांच्या मागोमाग बंगल्यात आली. अशोककुमारनी तिला पाण्याची बाटली पुढे केली. नंतर पाणी घेऊन ती स्त्री आभार मानत गेली. पुन्हा दिडेक वाजताच्या सुमारास एक किंकाळी ऐकू आली म्हणून दादामुनी उठून बाहेर आले. हातात टॉर्च व पिस्तूल घेऊन ते बाहेर आले तर बंगल्याच्या फाटकापाशी एक कार होती. त्या गाडीत एक माणूस शेवटच्या घटका मोजत होता. कुणीतरी त्याचा गळा चिरला होता. कडाक्याच्या थंडीतही अशोककुमार यांचा चेहरा ते दृश्य पाहून घामाने थबथबला. दृश्याने त्यांना कापरेच भरले. आत जाऊन त्यांनी व्हिस्कीचे दोन पेग घेतले नि ते झोपले. सकाळी उठून त्यांनी बंगल्याचे दार उघडले तेव्हा तिथे कुठली गाडीही नव्हती आणि मृतदेहसुद्धा नव्हता.

त्यांनी खंडाळा पोलीस स्टेशनात जाऊन याविषयी तक्रार नोंदवली. अशोककुमार यांना इन्स्पेक्टरनी विचारले, तुम्ही कुठल्या बंगल्यात उतरलाय?

का, जीजीभाई हाऊसमध्ये! अशोककुमार उत्तरले.

तरीच! इन्स्पेक्टर सराईतपणे म्हणाला, हा खून काल रात्री नव्हे चौदा वर्षांपूर्वी झालाय. एका बाईने तो खून केलेला. नंतर ती बाई मोटार अपघातात वारली. तेव्हापासून त्या बंगल्यात राहणाऱ्याला असे विचित्र अनुभव येतात.

अशोककुमार हे ऐकून अवाक् झाले. घरी आल्यावर त्यांनी मुंबईतल्या आपल्या मित्रमंडळीं... हा किस्सा सांगितला. मग अशीच एक कथा त्या... कमाल अमरोहींनी ऐकवली. आणि त्यावर चित्रपट बनला, *महल*. खेमचंद प्रकाश यांनी तो संगीतबद्ध केलेला लताने गायलेले *महल*मधील 'आयेगा आनेवाला' हे गीत तिच्या आवडत्या गाण्यांपैकी एक बनले.

या सगळ्या रसप्रद घटना शकुंतला लाटकर यांनी अनुवादित केलेल्या 'दादामुनीः रूपेरी वाटचाल' या पुस्तकातून घेतल्यात. अशोककुमारः लाईफ ॲण्ड टाईम्स या दिग्दर्शक बिमल रॉय यांच्या मित्राने नबेंद्रु घोषनी लिहिलेल्या इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद शकुंतला लाटकर यांनी मराठीत उत्तम केलाय. त्यातीलच हा काही नमुना आपल्यापुढे सादर केलाय. अशोककुमार यांच्या चाहत्यांना ते पुस्तक नक्कीच संग्रहणीय आहे.

□ **संकलनः अजित पोपट**